शिक्षण सेवक पदी नियुक्ती झाल्याने
कार्यमुक्त करणेबाबत

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग-१
जिल्हा परिषद आदेश क्रं.साप्रवि-१/आस्था-४/५३५/२०२६
अहिल्यानगर दिनांक स्वाक्षरी खाली नमूद प्रमाणे

वाचा:- १. मा. आयुक्त महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे , यांचेकडील शिक्षण सेवक पदासाठी जाहिरात क्र. जा.क्र.मरापप/बापवि/२०२५/२०८८ दि. २५/०४/२०२५

२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती संगमनेर यांचेकडील पत्र क्र. कार्या-१/आस्था-१/५७०/२०२५ दि. २१/०५/२०२५

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद अलिबाग यांचेकडील नियुक्ती आदेश क्र. राजिप/शिक्षण/प्राथ/आस्था-३/४०६५/२०२६, दि. ०९/०९/२०२६

४. श्रीम. अश्विनी प्रल्हाद खंडागळे, परिचर यांचा अर्ज दि. २८/०९/२०२६

५. गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती संगमनेर यांचेकडील पत्र क्र. कार्या-१/आस्था-३/२०६०/२०२६ दि. २८/०९/२०२६

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये संदर्भ क्र.१ अन्वये महाराष्ट्र राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये पवित्र या संगणकीय प्रणालीव्दारे शिक्षक भरती करीता शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) २०२५ या परीक्षेचे ऑनलाईन प्रणालीव्दारे अर्ज मागविण्यात आले होते.

संदर्भ क्र. २ अन्वये अन्वये गट विकास अधिकारी, पंचायत समिती संगमनेर यांनी श्रीम. अश्विनी प्रल्हाद खंडागळे, परिचर यांना शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) २०२५ या परीक्षेस बसण्यास परवानगी दिलेली होती.

संदर्भ क्र. ३ च्या आदेशान्वये श्रीम. अश्विनी प्रल्हाद खंडागळे, परिचर यांना रा.जि.प. शाळा मोरे, ता. मुरुड येथे शिक्षण सेवक म्हणून नियुक्ती देण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने संदर्भ क्र. ४ व ५ अन्वये श्रीम. अश्विनी प्रल्हाद खंडागळे, परिचर यांची शिक्षण सेवक पदी निवड झाल्याने कार्यमुक्त करणे बाबत विनंती अर्ज गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती संगमनेर यांचे मार्फत प्राप्त झालेला आहे.

सदर पदावर हजर होणे कामी शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-१०९२/१०३३/प्र.क्र.३३/९२/०८ दिनांक २ डिसेंबर १९९७ नुसार श्रीम. अश्विनी प्रल्हाद खंडागळे परिचर यांना आदेशाचे दिनांकास कार्यालयीन वेळेनंतर कार्यमुक्त करणेत येत आहे. तरी सदर आदेशाची नोंद संबंधितांच्या मुळ सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संगणकीय सांकेतांक क्र. 202609290140166 असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 29-09-2026 20:03:21
आनंद भंडारी (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्रीम. अश्विनी प्रल्हाद खंडागळे, परिचर
द्वारा व प्रत — गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती संगमनेर
२/- सदरचा आदेश संबंधीतास बजावुन दिनांकित स्वाक्षरीची पोहोच व श्रीम अश्विनी प्रल्हाद खंडागळे , परिचर यांना कार्यमुक्त केलेल्या आदेशाची प्रत या कार्यालयास पाठवावी.

प्रत - गट विकास अधिकारी, पंचायत समिती संगमनेर
प्रत - निवड नस्ती

स्वाक्षरीत/-
आनंद भंडारी (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर